प्रेसनोट दिनांक १४/११/२०२२

(आर्थिक गुन्हे शाखा, सातारा यांची कारवाई)

श्री.१००८ चिंतामणी पार्श्वनाथ ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था मर्या., कोळकी, फलटण पतसंस्थेमध्ये एकुण २४,०१,६०,७६१/- रुपये रकमेचा अपहार करणारे तीन वर्षांपासून गुन्ह्यांमध्ये पाहिजे असलेले आरोपी (पतसंस्थेचे व्हा.चेअरमन, संचालक) यांना अटक केलेबाबत.

---

मा. समीर शेख, पोलीस अधीक्षक, सातारा व मा. बापु बांगर, अपर पोलीस अधीक्षक, सातारा यांनी सातारा जिल्ह्यामधील दाखल असलेल्या गुन्ह्यांमधील पाहिजे असलेल्या आरोपींना अटक करण्याच्या सूचना मा. मोहन शिंदे, पोलीस उप अधीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, सातारा यांना दिलेल्या होत्या. त्याअनुषंगाने मा. मोहन शिंदे, पोलीस उप-अधीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, सातारा यांनी आर्थिक गुन्हे शाखेतील पोलीस अधीकारी यांना त्यांचेकडे तपासाकरीता असलेल्या गुन्ह्यात पाहिजे असलेल्या आरोपींना अटक करणेबाबत सूचना दिल्या होत्या.

श्री.१००८ चिंतामणी पार्श्वनाथ ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था मर्या., कोळकी, फलटण जि. सातारा पतसंस्थेमार्फत चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक व व्यवस्थापक यांनी पतसंस्थेच्या ठेवीदारांकडून प्राप्त ठेवींच्या रकमांचा अपहार करुन ठेवीदारांची २४,०१,६०,७६१/- रुपयेची आर्थिक फसवणूक केलेबाबत ३१/०१/२०१९ रोजी फलटण शहर पोलीस स्टेशन येथे सदर प्रकरणी २ गुन्हे दाखल असून सदर गुन्ह्यांचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, सातारा हे करत आहेत. सदर गुन्ह्यातील आरोपी नामे १) प्रदीप बापुचंद गांधी, वय ६५ वर्षे रा. पुणे - पंढरपुर रोड रानडे पंपाशेजारी, फलटण २) धनेश नवलचंद शहा, वय ५७ वर्षे, रा. २१७ शुक्रवार पेठ, फलटण ३) भुषण कांतीलाल दोशी, वय ६५ वर्षे रा. २४८ शुक्रवार पेठ, फलटण ४) नाना खंडू लांडगे, वय ५५ वर्षे, रा. मौजे निभोरे ५) लाला तुकाराम मोहिते, ५२ वर्षे, रा. मौजे खुंटे ६) अजय अरविंद शहा, वय ५५ वर्षे, रा. मोती चौक, रविवार पेठ, फलटण (सर्व रा. ता.फलटण जि. सातारा) हे मागील ३ वर्षांपासून गुन्ह्यांमध्ये तपासकामी पाहिजे होते. दिनांक १४/११/२०२२ रोजी सदर आरोपी फलटण येथे येणार असल्याची बातमी मिळाल्याने सदर ठिकाणी सापळा लावून कारवाई करणेकामी मा. मोहन शिंदे, पोलीस उप अधीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, सातारा यांनी गुन्ह्याचे तपासी अधिकारी शिवाजी भोसले, सहा. पोलीस निरीक्षक यांना आदेश दिले. त्याप्रमाणे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी फलटण शहर व आजूबाजूचे परिसरामध्ये आरोपींचा शोध घेऊन आरोपींना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांचा गुन्ह्यामधील सहभाग निष्पन्न झालेने नमुद गुन्ह्यात त्यांना अटक करण्यात आलेली आहे.

सदर कारवाईमध्ये मा. समीर शेख, पोलीस अधीक्षक, सातारा व मा. बापु बांगर, अपर पोलीस अधीक्षक, सातारा यांच्या मार्गदर्शनाखाली व मा. मोहन शिंदे, पोलीस उप-अधीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, सातारा यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी भोसले, सहा. पोलीस निरीक्षक, सहा.पो.फौ. प्रमोद नलावडे, पो.ना. **६९९ मनोज जाधव, पो.ना.२०३७ संतोष राऊत, पो.कॉ. ६६४ शफिक शेख, पो.कॉ. ६६८ प्रसाद जाधव यांनी सहभाग घेतला असून सदर कारवाईमध्ये सहभागी अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे मा. समीर शेख, पोलीस अधीक्षक, सातारा व मा. बापु बांगर, अपर पोलीस अधीक्षक, सातारा यांनी अभिनंदन केले आहे.**

---

( मा.पोलीस अधीक्षक, सातारा यांचे मान्यतेने )

प्रति,

सर्व संपादक